पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/४/कावि/ ३१३ /२०१४
दिनांक – २८/०३/२०१४

प्रति,


मा.....................................
सदस्य, शहर सुधारणा समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची सभा दिनांक ०२/०४/२०१४ रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०२/०४/२०१४ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत -

१) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८.

मा.शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – २०**

दिनांक :- ०२/०४/२०१४ वेळ - दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०२/०४/२०१४ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

**अ) दिनांक २०/०२/२०१४, २५/०२/२०१४, ०५/०३/२०१४ व १९/०३/२०१४ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१८) सभावृत्तांत कायम करणे.**

**आ) दिनांक ०५/०३/२०१४ व १९/०३/२०१४ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १९) सभावृत्तांत कायम करणे.**

**----------**

**विषय क्र.१)** आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर योजनेनुसार आकुर्डी येथील सर्वे नं.३५/३/१ पैकी सुमारे ५० आर क्षेत्र आरक्षण क्र.५४८ नुसार प्राथमिक शाळेसाठी आरक्षित ठेवण्यात आलेले आहे. सदरचे आरक्षण पिंपरी चिंचवड मनपा नियंत्रण क्षेत्रात येत आहे. या आरक्षणासाठी पोहच रस्ता ९ मीटर रुंदीचा आहे. हा ९ मीटर रुंदीचा रस्ता शाळेसाठी अरुंद असून अपुरा आहे. तसेच या आरक्षणामध्ये रहिवासी घरे, चर्च असून सुमारे ८० टक्के क्षेत्र इमारतीने व्यापलेले आहे. या शाळेच्या लगतच्या परिसरामध्ये सेंट उर्सुला हायस्कूल, ट्रिनिटी विद्यालय, सरस्वती विद्यालय, म्हाळसाकांत विद्यालय तसेच पिं.चिं.मनपाचे आकुर्डी शाळा आहे. तरी या आरक्षणानुसार आता शाळेची आवश्यकता नाही. वरील सर्व बाबींचा विचार करता सदरचे आरक्षण क्र.५४८ नुसार शाळेसाठी आरक्षित जागा आरक्षणामधून वगळून रहिवासी निवासी विभागात समाविष्ठ करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करुन सदरचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणेस मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

( दिनांक ०२/०४/२०१४ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.२)** मा.अ प्रभाग समिती ठराव क्रमांक २२० दिनांक ०८/०१/२०१४ नुसार पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने सन १९९५ च्या विकास आराखडयानुसार आकुर्डी येथील स.नं.३५/३/१ पैकी सुमारे ५० आर क्षेत्र आरक्षण क्र.५४८ नुसार प्राथमिक शाळेसाठी आरक्षित ठेवण्यात आले आहे. सदर आरक्षण पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियंत्रणामध्ये सन १९९७ पासून आलेले आहे. सदर आरक्षणामध्ये काही १९९५ व १९९७ पुर्वीची जुनी बांधकामे होती व नंतरच्या काळात देखील काही बांधकामे झालेली आहेत. या आरक्षणामध्ये १८ गुंठे जागा रिकामी असून इतर जागेत अनाधिकृत बांधकामे आहेत. १८ गुंठे रिकाम्या जागेचे भूसंपादन प्रक्रीया सुरु करणेस व ज्या जागेमध्ये बांधकामे झालेली आहेत ती जागा आरक्षणामधून वगळणेस मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

( दिनांक ०२/०४/२०१४ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.३)** मोबाईल टॉवरची उभारणी व अनुषंगिक बाबींसाठी नवीन विनियम अंतर्भुत करण्याबाबत मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१ एए) ए अन्वये शासनाने प्रस्तावात नमुद संदर्भिय क्र.१ अन्वये नोटीस जाहीर केली आहे. सदर नोटीसीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या हरकती / सूचना प्रस्तावात नमुद संदर्भिय क्र.२ च्या पत्रान्वये पाठविण्यात आल्या असून त्यावर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेचे अभिप्राय मागविले आहेत. त्यानुसार सदरचे पत्र, शासन सुचना व हरकती / सुचनांवर अभिप्राय देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

( दिनांक ०२/०४/२०१४ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.४)** पिंपरी चिंचवड शहराच्या शासन निर्णय क्र.टीपीएस - १८९३/१२७६/सीआर-१७४/९३/युडी-१३, दिनांक १८ सप्टेंबर १९९५ अन्वये मंजूर विकास योजनेत व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग अधिसूचना क्र.टीपीएस-१८९३/१४१२/युडी-१३, दिनांक २८ नोव्हेंबर १९९५ अन्वये मंजूर तथापि महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग अधिसूचना क्र.पीसीएन-१६९७/९३४/प्र.क्र.८९/नवि-२२, मंत्रालय, मुंबई दिनांक १५ नोव्हेंबर १९९७ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेमध्ये समाविष्ट करण्यात आलेले तसेच शासन निर्णय क्र.टीपीएस -१८०६/१४१/प्र.क्र.१९८६/२००९/नवि-१३, दिनांक २९ मे २०१० अन्वये फेरबदल प्रस्तावानुसार मंजूर विकास योजनेतील खालील तक्त्यात

दर्शविलेल्या प्रस्तावित आरक्षणाचे भूसंपादन त्वरित करणे करीता संदर्भिय पत्रान्वये मा.नगरसदस्या यांनी कळविले आहे.

| अ.क्र. | आरक्षण क्रमांक | आरक्षणाचे प्रयोजन | स.नं. | बाधित होणारे संपादन करावयाचे एकूण सुमारे क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| १ | आरक्षण क्र.३९४ | माध्यमिक शाळा | स.नं.२४५ पैकी, २४६ पैकी व २४७ पैकी | १००००.०० चौ.मी. |
| २ | आरक्षण क्र.३९६ | प्राथमिक शाळा | स.नं.२३१ पैकी. | २०००.०० चौ.मी. |

तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये तातडीने संपादन करणेकामी सदर आरक्षणाचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

( दिनांक ०२/०४/२०१४ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/४/कावि/३१३/२०१४
दिनांक - २८/०३/२०१४

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

\\Nagersachiv4\nnn\Nagersachiv1/shsu-१३-१४\agenda  २० doc.